जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर - ४१६००२
दुरध्वनी क्रमांक : 0231-2659232 टोल फ्री (1077)
Email: rainkolhapur@gmail.com

सत्यमेव जयते

जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/856/2020, दिनांक :-26/03/2020.

वाचले

1. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897.
2. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005,
3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य-5, दिनांक 13/03/2020, 14/03/2020 तसेच 15/03/2020 रोजीच्या अधिसुचना.
4. फौजदारी प्रकिया संहिता, 1973 चे कलम 144 (1) (3).
5. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक 23 व 24 मार्च 2020.
6. इकडील जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/736/2020, दिनांक 22/03/2020 रोजीचा आदेश.
7. इकडील कार्यालयाकडील क्र.कार्या-7/गृह/पोल/एसआर-05/2020, दिनांक 22/03/2020 रोजीचा आदेश.
8. इकडील जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/789/2020, दिनांक 23/03/2020 रोजीचा आदेश.
9. इकडील जा.क्र.नैआ/कोरोना विषाणू/790//2020, दिनांक 24/03/2020 रोजीचा आदेश

विषय :- **कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रात म.न.पा. कर्मचाऱ्यांना पास देणेकामी संबंधित महानरगपालिकेचे वॉर्ड अधिकारी यांना प्राधिकृत करणेबाबत.**

## -: आदेश :-

सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च 2020 अन्वये कोरोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी इकडील कार्यालयाकडून उपरोक्त् वाचले मधील अ.क्र. 6 ते 8 अन्वये फौजदारी प्रकिया संहिता, 1973 चे कलम 144 प्रमाणे नागरिक व खाजगी वाहने यांच्या हालचालींवर दिनांक 31/03/2020 रोजीचे रात्री 12.00 वाजेपर्यंत बंदी आदेश पारित करणेत आलेले आहेत. सदर बंदी आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवेतील वाहनांना व जे कर्मचारी प्रत्यक्ष अत्यावश्यक सेवा, जिवनावश्यक वस्तू व आपत्ती व्यवस्थापन कामकाजकामी सहभागी आहेत, अशा कर्मचाऱ्यांना पासेस व त्यांचे खाजगी वाहनांना वाहन परवाना देणेकामी कोल्हापूर महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग अधिकारी (वॉर्ड ऑफीसर) यांना त्यांचे त्यांचे कार्यक्षेत्रात देणेकामी प्राधिकृत करणेत येत आहे.

सदर कर्मचारी ज्या प्रभागात कार्यरत आहेत, त्या प्रभाग अधिकारी यांनी त्या कर्मचाऱ्यांची सेवा अत्यावश्यक कारणासाठी आहे याबाबत खातरजमा करून ठराविक कालावधीसाठी संबंधित प्रभाग अधिकारी असे वाहन परवाने किंवा पासेस देण्याची कार्यवाही करतील. असे वाहन परवाने किंवा पासेस अत्यावश्यक बाबीसाठी जे कर्मचारी प्रत्यक्ष

2 / . . .

Scanned by CamScanner

कामावर आहेत त्यांनाच देण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत अनावश्यक परवानग्या देवुन संचारबंदीचे उल्लंघन होणार नाही याची खबरदारी संबंधित प्रभाग अधिकारी यांनी घ्यावी. सदर पासेस व वाहन परवाने दिलेबाबतचे नोंदवहीचे नमुने या आदेशासोबत जोडणेत येत आहे. तसेच अधिकारी / कर्मचारी पास व वाहन परवानाचे नमुने या आदेशासोबत जोडले आहेत.

तसेच सुलभ संदर्भासाठी वाचले क्र.9 वरील नमूद आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे.

(दौलत देसाई)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**कोल्हापूर**

प्रति :- 1) आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

याबाबत संबंधीत प्रभाग अधिकारी (वॉर्ड ऑफीसर) यांना योग्य त्या सुचना देण्यात याव्यात व आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करणेसाठी .

2) पोलीस अधिक्षक, कोल्हापूर

याबाबत आपले अधिनस्त कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील संबंधित पोलीस अधिकारी यांचे निदर्शनास आणून अंमलबजावणी करणेत यावी.

3) सर्व विभाग प्रमुख

4) उपविभागीय अधिकारी, करवीर उपविभाग, कोल्हापूर

5) उपविभागीय पोलीस अधिकारी कोल्हापूर शहर

6) तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी करवीर

7) प्रभाग अधिकारी (वॉर्ड ऑफीसर) सर्व, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर. सोबत रजिष्टर (नमुना-1), पासेस व वाहन परवान्याचा नमुना सोबत जोडणेत येत आहे.

Scanned by CamScanner